मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सरकारला घरी बसविण्यासाठी 'मशाल' पेटवा

## कर्जत विधानसभेत संवाद मेळावा : कर्जतकर एकमताने उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या पाठीशीच

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी बळीराजाचा सहानुभूतीपूर्वक विचार केला. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा धाडसी निर्णय त्यांनी प्राधान्याने घेतला आणि तो तातडीने लागूही केला. परंतु, गद्दारांच्या मदतीने राज्याची सत्ता मिळवलेल्या भाजपच्या केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी शेतक-यांना वा-यावर सोडण्याचे काम केले. या सरकारला घरी बसविण्यासाठी मतदान करा आणि मावळ लोकसभेत शिवसेनेची मशाल पेटवा, असे आवाहन महाविकास आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी शुक्रवारी (दि.18) केले.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ कळंभ जिल्हापरिषद, कावोळे व गौरकामत विभागातील नागरिकांशी कडाव येथील श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय येथे संवाद मेळावा पार पडला. त्या वेळी ते बोलत होते. या मेळाव्याप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस रामशेठ राणे, माजी समाज कल्याण सभापती नारायण डामसे, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, काँग्रेसचे कर्जत तालुका अध्यक्ष संजय गवळी, रायगड जिल्हा महिला आघाडीच्या प्रमुख सुवर्ण जोशी, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते दिनानाथ देशमुख, आपचे डॉ. रियाज पठाण, कळंब ग्रामपंचायत सरपंच प्रमोद कोडलीकर, हुतात्मा पाटील, भाई कोतवाल, पंचायत समितीचे माजी उपसभापती जयवंती हिंदोला, माजी पंचायत समिति सदस्य अंजली शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, युवक-युवती यांच्यासह महाआघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.



संजोग वाघेरे पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारी भुमिका राज्याचे कुटुंबप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे साहेब यांनी घेतली. शेतकऱ्यांसह सर्व समाज घटकांसाठी ममतेने काम केली. अनेक योजना लागू केल्या. मात्र, सध्याच्या केंद्र व राज्यातील सरकारला शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्गाची चिंता नाही. शेतकरी वर्गासाठी ठोस असे काम झाले नाहीत. त्यांच्यासाठी नवीन योजना आणल्या गेल्या नाहीत. शेतकऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडण्याचे पाप राज्यातील महायुती सरकारने केले आहे. सर्वसामान्य आणि महिला वर्गाची काहीच चिंता दिसत नाही. देशातील महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. देशासह राज्यात वाढत्या बेरोजगारीने गंभीर रूप धारण केले आहे. बेरोजगार युवक रस्त्यांवर उतरून आंदोलन करीत आहेत. अनेक घटकांकडून रोष व्यक्त केला जात आहे. देश कोठे नेऊन ठेवला आहे, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. अशा हुकुमशाही आणि जुलमी सरकारला खाली खेचण्यासाठी महाविकास आघाडीला साथ द्यावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

### 'मशाल' चिन्ह घरोघरी पोहोचले

» पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांनी मावळ लोकसभेतून संजोग वाघेरे पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्या दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासह महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षाचे कार्यकर्ते मशाल हे चिन्ह घेऊन गावागावात प्रचार करत आहेत.

# किवळेतील दुर्घटनेनंतर पालिकेला जाग

## महापालिका हद्दीतील काही जाहिरात फलक हे परवानगीकरिता प्रलंबित : होर्डिंगधारकांना महापालिकेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जाहिरात फलकांसाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी सांगाड्यांचे (होर्डिंग) स्ट्रक्चरल मजबूत असल्याची खातरजमा करावी. कमकुवत असेल तर त्वरित हटविण्यात यावे. वादळ, वारा, जोरदार पावसाने स्ट्रक्चर पडून जीवित किंवा वित्तहानी झाल्यास त्यास जाहिरात फलकधारकासह संबंधित संरचना अभियंत्यास जबाबदार धरण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी जाहिरात फलकधारकांनी जाहिरात फलक मंजूर करून उभारले आहेत. मात्र, पावसाळ्याच्या सुरुवातीस वादळवारा मोठ्या प्रमाणावर येतो. वादळवाऱ्याने कुजलेले, गंजलेले, कमकुवत अशा प्रकारचे जाहिरात फलकांचे स्ट्रक्चर पडून जीवित किंवा वित्तहानी



होण्याच्या घटना यापूर्वी झालेल्या आहेत. गेल्यावर्षी किवळेत लोखंडी सांगाडा अंगावर पडल्याने पाच जणांचा बळी गेला होता. या घटना टाळण्यासाठी महापालिकेने बैठक घेतली.

महापालिका हद्दीतील काही जाहिरात फलक हे परवानगीकरिता प्रलंबित आहेत. ही बाब उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. तसेच सर्व जाहिरात फलकांची सादर केलेली स्थापत्यविषयक स्थिरता (स्ट्रक्चर स्टॅबिलिटी) पुन्हा सन २०२४-२५ एप्रिलअखेरपर्यंत तपासून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

आकाशचिन्ह विभागाचे उपआयुक्त संदीप खोत म्हणाले की, स्थापत्यविषयक स्थिरता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणार आहे. जाहिरात फलकांना ज्या संरचना अभियंत्याने प्रमाणपत्र दिले आहे. त्यापैकी एखादे जाहिरात फलक कमकुवत आढळले किंवा फलक पडून काही जीवित व वित्तहानी झाल्यास संबंधित संरचना अभियंत्यास जबाबदार धरण्यात येणार आहे.

# राजकीय धुमश्चक्रीत पुणेकरांचा 'कोंडं'मारा

## 'मविआ' आणि महायुतीच्या सभांमुळे लष्कर-स्टेशन परिसर 'जाम' : भर उन्हात मनस्तापाचा वळसा

**पुणे | प्रतिनिधी**

महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केले. तसेच, आपापल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभाही घेतल्या. वाहतूक पोलिसांनी या सभांच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियोजन करीत अनेक रस्त्यांवरील वाहतूक वळवली होती. जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय आणि सभास्थानांकडे जाणारे रस्ते बंद ठेवले होते. या राजकीय धुमश्चक्रीत पुणेकरांचा मात्र, भर उन्हात चांगलाच घाम निघाला. या सभांना आलेले कार्यकर्ते, त्यांची रस्त्यांवर बेशिस्तपणे लागलेली वाहने, बंद असलेले रस्ते यामुळे लष्कर, पुणे स्टेशन, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रचंड कोंडी झाली होती. वाहनचालकांना अनेक ठिकाणी तीन ते पाच किलोमीटरचा वळसा घालून जावे लागले.

बारामती,पुणे,शिरूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांकडून गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार होते. तसेच, क्वॉर्टर गेट परिसरात महाविकास आघाडीची आणि हॉटेल ब्ल्यू नाईलजवळ महायुतीच्या जाहीर सभेचे आयोजन केले होते. त्यानुसार, दोन्ही बाजूच्या उमेदवारांकडून गुरुवारी विभागीय आयुक्त कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजूंच्या हजारो कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. दोन्हीही बाजूने जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. त्याकरिता मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते. दरम्यान, सभेला जिल्ह्यातून तसेच शहराच्या विविध भागांमधून गाड्यांमध्ये आलेल्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर जागा मिळेल तिथे वाहने लावली. त्यामुळेही वाहतूक कोंडीमध्ये भर पडली. सभास्थानावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केलेला होता.

पुणे शहर वाहतूक पोलिसांनी बुधवारी प्रसिद्धीपत्रक काढत क्वॉर्टर गेट परिसर, विभागीय आयुक्त कार्यालय, रास्ता पेठ, साधू वासवानी चौक आदी भागातील रस्ते बंद करीत येथील वाहतूक अन्य रस्त्यांनी वळवली होती. दरम्यान, बी. टी. कवडे रस्ता, घोरपडीहून येणारी वाहतूक रेसकोर्समार्गे वळविण्यात आलेली होती. सोमवार पेठेतील नरपतगिरी चौक, पॉवर हाऊस चौक, संत कबीर चौक, तसेच पुणे स्टेशन परिसरातील आगरकरनगर, क्वीन्स गार्डन परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. बुधवारी रात्रीपासूनच बॅरिकेटिंगला सुरुवात करण्यात आली होती.

गुरुवारी सकाळी सहा ते दुपारपर्यंत हा बदल केला जाणार होता. मात्र, गुरुवारी संध्याकाळपर्यंत रस्त्यात असलेल्या मंडप आणि स्टेजमुळे कोंडी कायम होती. दरम्यान, सकाळपासूनच चौकाचौकात ठिकठिकाणी वाहतूक पोलिसांचा मोठा फौजफाटा नेमलेला होता. वाहनांची संख्या, त्यातही अवजड वाहने, भल्या मोठ्या पीएमपीएमएल बसेस, अरुंद रस्ते यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

घोरपडे पेठ, नाना पेठ, भवानी पेठेकडून क्वॉर्टर गेट परिसरात येणाऱ्या वाहनचालकांना लष्कर, स्टेशन, मंगळवार पेठ, आरटीओ असा वाळसा घालून यावे लागले. लष्कर परिसराकडून स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनचालकांना साधू वासवानी चौकापासूनच कोंडीचा सामना करावा लागला. या भागात येऊ पाहणाऱ्या आणि बाहेर जाऊ पाहणाऱ्या वाहनचालकांना जवळपास तीन ते पाच किलोमीटरचा वळसा घालून जावे लागले. अनेक वाहनचालक तर गोल गोल फिरत राहिले. मात्र, त्यांना कोंडीमधून बाहेर पडता आले नाही. सर्व प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाल्याने अनेक वाहनचालकांनी आपली वाहने गल्ली-बोळात घातली. त्यामुळे छोट्या छोट्या लगतच्या रस्त्यांवर देखील कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



### रस्त्यावरील सभांमुळे कोंडी

**» महाविकास आघाडी आणि महायुतीला रस्त्यावर सभा घेणे आवश्यकच होते का? या भागात दोन-तीन मैदाने आहेत. त्या मैदानांवर सभा घेता येऊ शकली असती. महाविकास आघाडीची सभा झाली त्या रस्त्याला लागूनच टिळक आयुर्वेदिक महाविद्यालयाचे मैदान आहे. तसेच, महायुतीची सभा झाली तेथून जवळच बी. जे. मेडिकल कॉलेजचे मैदान आहे. या मैदानावर सभा आयोजित करता येऊ शकल्या असत्या. तसेच, या ठिकाणी कार्यकर्त्यांच्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्थाही करता आली असती. मात्र, राजकीय पक्ष नियोजनात कमी पडले. या ठिकाणी येणाऱ्या रुग्णवाहिकांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसल्याचे सांगण्यात आले.**

# शहरात गोळीबारीची सलग चौथी घटना

## हॉटेलमध्ये पैशाची मागणी करून पैसे न दिल्याने सराईतांचा एकावर गोळीबार

**पुणे | प्रतिनिधी**

हॉटेलमध्ये पैशाची मागणी करून पैसे न दिल्याने सराईतांनी एकावर गोळीबार केल्याची घटना गुरुवारी मध्यरात्री येरवडा भागात घडली. या घटनेत विकी राजू चंडालिया ( रा. जय जवान नगर येरवडा ) जखमी झाला असून सात आरोपींविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी आकाश सतीश चंडालिया, अक्षय सतीश चंडालिया, अमन सतीश चंडालिया, अभिषेक शाम चंडालिया ( सर्वजण रा. रेंजहिल्स,पुणे ), सुशांत प्रकाश कांबळे( रा. पर्णकुटी सोसायटी येरवडा ), संदेश संतोष जाधव, संकेत तारू (दोघे रा. जय जवान नगर येरवडा ) यांच्याविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गोळीबाराचे नेमके कारण समजू शकलेले नाही. वैयक्तिक वादातून गोळीबार झाला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आरोपींवर पुणे शहर आणि ग्रामीण पोलीस हद्दीत गुन्हे दाखल आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास अग्रसेन हायस्कूलसमोर असणाऱ्या एका हॉटेलमध्ये काही सराईत गुन्हेगार शिरले होते. हॉटेल चालक विकी चंडालिया याला त्यांनी पैशाची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपी आकाश चंडालिया यांनी त्याच्याकडील पिस्तूल काढून विकीच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. त्याने आणि त्याच्या साथीदारांनी त्याला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. गोळीबार करून आरोपी पसर झाले. या घटनेची माहिती मिळताच येरवडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त आरती बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील दिली.



या प्रकरणी काही संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. अग्रसेन हायस्कूल समोरील या हॉटेलबाबत यापूर्वी नागरिकांनी तक्रारी दिल्या होत्या. या परिसरात लुटमार तसेच दहशत निर्माण करण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या हॉटेल, पान टपरी व इतर अवैध व्यवसायामुळे शहरात गंभीर गुन्ह्यांसह गोळीबारासारख्या घटना घडत आहेत. पोलीस आणि प्रशासनाकडून कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# पिंपरी मर्चंट फेडरेशनचा खासदार बारणे यांना पाठिंबा

## 'व्यापाऱ्यांच्या अडीअडचणींना धावून येणारे खासदार बारणे यांना विक्रमी मताधिक्य मिळेल'; श्रीचंद आसवानी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी कॅम्पमधील व्यापाऱ्यांची शिखर संघटना असलेल्या पिंपरी मर्चंट फेडरेशनने मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना काल (बुधवारी) रात्री एका बैठकीत जाहीर पाठिंबा दिला. व्यापारी वर्गाच्या अडीअडचणींना धावून येणाऱ्या बारणे यांना विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

पिंपरी कॅम्प येथील उबाडो पंचायत ट्रस्टच्या बी. टी. अडवाणी सभागृहात झालेल्या या बैठकीस खासदार बारणे, पिंपरी मर्चंट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी, उबाडो पंचायत ट्रस्टचे अध्यक्ष ओमप्रकाश तथा बाबू आडवाणी तसेच हरेश बोधानी, अनिल आसवानी, श्याम मेघरानी, इंदरशेठ बजाज, सुशील बजाज यांच्यासह व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीचंद आसवानी म्हणाले की, खासदार बारणे हे पिंपरी कॅम्प मधील व्यापाऱ्यांच्या पाठीशी सदैव उभे असतात. सुख-दुःखात ते साथ देतात. कोविड काळात त्यांनी व्यापाऱ्यांना खूप मदत केली. पिंपरी कॅम्पातील माथाडी कामगारांचा प्रश्न त्यांनी सोडवला. व्यापाऱ्यांच्या अडीअडचणींत ते सदैव पाठीशी असतात. त्यामुळे या निवडणुकीतही बारणे यांनाच पाठिंबा देण्याचा निर्णय व्यापारी बांधवांनी घेतला आहे.

पिंपरी कॅम्पला गावठाणाचा दर्जा देण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाली असून निवडणूक झाल्यानंतर त्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे खासदार बारणे यांनी सांगितले. सिंधी बांधवांना निर्वासित सनद देण्याचा विषय लवकरच मार्गी लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पिंपरी कॅम्पातील व्यापारी प्रामाणिकपणे व कष्टाने काम करतात. त्यांच्यावर अन्याय होत



असेल तर एका फोनवर मी काम करतो. माझा कोणालाही त्रास नसतो, असे बारणे म्हणाले. चुकीचे काम आपण कधी केले नाही आणि चुकीच्या कामाला कधी पाठीशी घातले नाही, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सक्षम नेतृत्व आणि आपण केलेले काम, सातत्याने ठेवलेला संपर्क या आधारे आपण मते मागत आहोत, असे बारणे म्हणाले.

पिंपरी कॅम्प मधील विविध व्यापारी संघटनांच्या वतीने बारणे यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. सुशील बजाज यांनी सूत्रसंचालन केले.

# अकरा वर्षांतील सर्वाधिक तापमानाची नोंद

## समुद्रावरून येत असलेल्या बाष्पयुक्त उष्ण वाऱ्यांमुळे हवेत आर्द्रता वाढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहर आणि परिसरात दोन दिवसांपासून पडत असलेला अवकाळी पाऊस आणि बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रावरून येत असलेल्या बाष्पयुक्त उष्ण वाऱ्यांमुळे शहर परिसरातील हवेत आर्द्रता वाढली आहे. त्यामुळे पुणेकरांना असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

शहर आणि परिसरात मागील दोन दिवसांपासून तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. त्यामुळे हवेत आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. त्यात भर म्हणून बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रावरून येत असलेल्या बाष्पयुक्त उष्ण वाऱ्यामुळे पुण्यासह राज्यभरात आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. सकाळी आणि सायंकाळी तापमान कमी झाल्याच्या काळात हवेतील आर्द्रता वाढते. त्यामुळे तापमान कमी असतानाही म्हणजे रात्री, पहाटे आणि सायंकाळीही असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिली.

अवकाळी पावसाच्या हजेरीनंतर तापमानात घट होण्याचा अंदाज होता. पण, गुरुवारी पुन्हा हडपसर, वडगाव शेरी, कोरेगाव पार्क येथील पारा ४३ अंशांच्या वर गेला होता. हडपसरमध्ये सर्वाधिक ४३.५, वडगाव शेरीत ४३.१, कोरेगाव पार्कमध्ये ४३.०, मगरपट्ट्यात ४२.४, लवळेत ४१.८, पाषाण, शिवाजीनगरमध्ये ४१.०, एनडीएत ४०.९ आणि हवेलीत ३९.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद



झाली आहे.

सलग चौथ्या दिवशी शहरातील हडपसर येथे उच्चांकी ४३.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सूर्य तळपल्याने हडपसरसह कोरेगाव पार्क आणि वडगावशेरी येथे सर्वाधिक ४३ अंशाच्या पुढे उष्णतेचा पारा गेला, त्यामुळे अंगाची लाहिलाही आणि उकाड्याने पुणेकर हैराण झाले आहेत.

पुणे शहरातील उष्णतेचा पारा उच्चांकी आहे. वाढत्या तापमानामुळे पुण्यात विदर्भाच्या तापमानाचा अनुभव येत आहे. मार्च महिन्याच्या अखेरीस ४३ अंशावर गेलेला पारा एप्रिल महिन्याच्या

### पारा 43 अंशांच्या वर

» पुणे शहर आणि उपनगरात यंदाच्या एप्रिल महिन्यांत मागील अकरा वर्षातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. २०१३ पासून २०२३ पर्यंत पुण्यात एप्रिल महिन्याचे तापमान सरासरी ३७ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहिले आहे. २०१९ मध्ये एप्रिल महिन्याच्या अखेरीस २७ एप्रिल रोजी एकदाच पारा ४३.० अंशांवर गेला होता. त्यानंतर यंदा एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सलग पाच-सहा दिवस उपनगरात पारा ४३ अंशांच्या वर राहिला आहे. प्रामुख्याने वडगाव शेरी, कोरेगाव पार्क, लवळे, हडपसर आदी ठिकाणी पारा ४३ अशांच्या वर गेल्याचे दिसून येत आहे.

पहिल्या आठवड्यात खाली आला. त्यात अवकाळी पावसामुळे कमाल तापमान ४० अंशापर्यंत खाली गेले होते. मात्र, मागील चार दिवसांपासून वडगावशेरी, हडपसर, मगरपट्टा, कोरेगांव पार्क आणि शिरूर भागात दररोज उच्चांकी तापमानाची नोंद होत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील तापमानही ४१ अंशाच्या पुढे गेले आहे.

हडपसर – ४३.५, वडगांवशेरी – ४३.१, कोरेगांव पार्क ४३, शिरूर ४२.८, राजगुरूनगर – ४२.७, मगरपट्टा – ४२.४, चिंचवड – ४२, तळेगाव – ४१.३, शिवाजीनगर आणि पाषाण – ४१, एनडीए – ४०.९, बालेवाडी – ४०.७, इंदापूर – ४०.५, बारामती – ३९.३, हवेली – ३९.२

# पुण्यात मुळशी पॅटर्न मात्र जोरात

## पोलीस ठाण्याच्या हद्दीत व्यवसायीकावर 'मुळशी पॅटर्न स्टाईनले' हल्ला



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील गुन्हेगारांची नागपुर पॅटर्न स्टाईलने झाडाझडती आणि शाळा घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणात राहिल अशी अपेक्षा आयुक्तालयात बसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना होती. त्यांच्या देहबोलीतून तसा आत्मविश्‍वासही दिसत होता. मात्र मागील काही दिवसांत घडलेल्या घटना पहाता गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक आहे की नाही? असा सवाल उपस्थित रहात आहे.

पोलिस आयुक्तालयात आर्म ॲक्टचे गुन्हे दाखल झालेल्यांची झाडाझती घेतल्यानंतर त्याच रात्री शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बांधकाम व्यवसायीकावर 'मुळशी पॅटर्न स्टाईनले' हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर शहरात सुरु झालेले गोळीबाराचे सत्र थांबायचे नाव घेईना. शहरात सलग चौथ्या दिवशी गोळीबाराची घटना घडली आहे.

पुणे पोलिस आयुक्तलयाच्या आवारात शहरातील सर्व छोट्या मोठ्या टोळ्यांची हजेरी घेऊन त्यांना तंबी देण्यात आली होती. यानंतर अंमली पदार्थ विक्रीचे गुन्हे दाखल असणाऱ्यांची झाडाझडती घेण्यात आली. तर नुकतीच आर्म ॲक्टचे गुन्हे दाखल असलेल्यांची झाडाझडती घेतली गेली. तरीही गुन्हयाचा आलेख मात्र कमी होण्याचे नाव घेईना. कोयत्याचा वापर सर्रास गुन्हयामध्ये केला जात आहे. मंगळवारी दुपारी पावने दोन वाजता बांधकाम व्यवसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न झाला.

बुधवारी सकाळी हडपसर येथे व्यवसायिक स्पर्धेतून एका माजी सैनिकाने दुसऱ्या माजी सैनिकावर गोळ्या झाडल्या. तर गुरुवारी पहाटे भुमकर चौक नऱ्हे येथे माचीस मागीतल्या कारणातून दोघांवर गोळीबार झाला. त्यानंतर आता येरवड्यात आता गोळीबाराचा प्रकार घडला आहे.

शुक्रवारी पहाटे तीन ते चार वाजताच्या सुमारास येरवडा येथील अग्रसेन शाळेसमोर एका तरुणावर गोळीबार करण्यात आला आहे. त्याच्यावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या असून एक गोळी तरुणाला लागल्याची माहिती आहे. पूर्वीच्या वादातून हा प्रकार घडल्याचे समजते. विकी चंदाले असे गोळीबार झालेल्या तरु णाचे नाव आहे. तर आकाश चंदाले याने हा गोळीबार केलाय. पोलिसांनी दिलेला इशारा गुन्हेगारांनी गांभीर्यान घेतला नसल्याचे वरील घटनांवरुन दिसते.

### पब चालकांची शाळा रात्रीही सुरु

» पोलीस आयुक्तालयात गुन्हेगारांप्रमाणेच पब चालकांचीही शाळा घेण्यात आली. त्यांना दिलेली वेळ पाळण्याचे सांगण्यात आले तसेच पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनाही लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. मात्र खुद्द महापालिकेकडून तीन तीन तक्रार अर्ज देऊनही पबवर कारवाई झाली नाही. अखेर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी एका संयुक्त बैठकीत हा विषय काढल्यावर आयुक्तालयातूनच कारवाईसाठी पथक पाठवले गेले. संबंधीत पब सील झाले तसेच महापालिकेनेही अतिक्रमण कारवाई केली. यानंतर तरी शहराती पब नियम आणि वेळ पाळतील अशी अपेक्षा होती. मात्र स्थानिक पोलिसांना हातीशी धरुन आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांना पबवाले जुमानेनात अशी घटना पुन्हा घडली. कल्याणीनगर येथील एक पबमध्ये वेळेचे बंधण धुडकावून मद्यविक्री सुरु असल्याने त्यावर उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. मात्र याची कल्पनाची आयुक्तालयात बसलेल्या वरिष्ठांना नव्हती.

---

# बारामतीची निवडणूक गावकी-भावकीची नाही

## भावनिकता व खोट्या प्रचाराला साद देऊ नका : अजित पवार

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीची लोकसभा मतदारसंघाची निवडणूक ही गावकी- भावकीची निवडणूक नाही. नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी ही निवडणूक आहे. विनाकारण त्यात भावकी आणण्याचा प्रयत्न केला जातो. मतदारांना भावनिक करण्याचा प्रयत्न केला जातो. काही लोकांच्या घरी जाऊन त्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित पुण्यातील सभेत ते बोलत होते. या वेळी प्रमुख नेत्यांसह आमदार दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, सिद्धार्थ शिरोळे, भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, राहुल कुल, माजी खासदार प्रदीप रावत, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी आमदार विजय शिवतारे, कांचन कुल, विकास महात्मे आदींसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटातील कुलदीप कोंडे-देशमुख यांनी शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला. निवडणुका झाल्यानंतर एकत्र येण्याच्या गप्पा मारल्या जात असून, ही केवळ बनवाबनवी आहे. त्यामुळे भावनिकता व खोट्या प्रचाराला साद देऊ नका, असे आवाहन अजित पवार यांनी केले. मत खणखणीत



द्या अन् काम वाजवून घ्या, असेही त्यांनी सांगितले.

बारामतीत अजित पवार यांनीच विकासाची किमया आणली आहे. महायुतीने उमेदवारी देत विश्वास दाखविला असून, तो सार्थ ठरविणार आहे. आता वेळ बदलली असली, तरी घड्याळ मात्र तेच आहे, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

सूनबाईला पाठवा दिल्लीत अन् लेकीला पाठवा गल्लीत, अशा घोषणा देण्याचा आग्रह विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी धरला. या वेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी खास आपल्या काव्यमय शैलीत भाषण केले. सुनेत्रा पवार या पवार कुटुंबातल्याच असल्याने त्यांना बाहेरच्या म्हणणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

अजित पवार यांनी भाषणात बारामती, इंदापूर, दौंडच्या पाण्याचा मुद्दा मांडला. गुंजवणीचे पाणी आणणार. कर्नाटकाला वाया जाणारे पाणी दुष्काळी भागात पुरंदर, बारामती, इंदापूर, दौंडमध्ये आणणार, असे अजित पवार म्हणाले.

जलसंपदामंत्री या नात्याने जयंत पाटील असे अजित पवार म्हणताच उपस्थितांत हशा पिकला. स्वत: अजित पवारही भाषण थांबवून हसू लागले. नंतर त्यांनी चूक सुधारत देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले.

### मैत्रीत अंतर पडू न देण्याची शिवतारेंची भूमिका

» बारामतीमधून शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदें यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यांनी निर्णय मागे घेतला. महायुतीच्या सभेला शिवतारे आवर्जून उपस्थित होते. विरोधक किंवा मित्र कसा असावा, हे शिवतारे यांच्याकडे बघून आपण शिकायला हवे. एकदा मैत्री केली, की पडेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल; पण मैत्रीला अंतर पडू देत नाहीत, असे काम विजय शिवतारे यांचे असल्याचे अजित पवार यांनी नमूद केले.